**प्रेस नोट** **दिनांक २२/०३/२०१९**

## विश्रांतवाडी पोलीस स्टेशन,पुणे

### रस्त्यात कडक उन्हाने चक्कर येवुन बेशुध्द झालेल्या इसमास तात्काळ हॉस्पीटल मध्ये अँडमीट केले बाबत.

दिनांक २१.०३/१९ रोजी पिटर मोबाईल वरील कर्मचारी पेट्रोलींग करीत असताना पेट्रोलींग दरम्यान सकाळी ११.४५ वा.सुमारास टँकरोड शांतीनगर येथे एक इसम उन्हाने चक्कर येवुन बेशुध्द अवस्थेत रोडवरवर पडला असल्याने .सदर ठिकाणी अँब्युलन्स व सँपर्स मार्शल यांना तात्काळ घटनास्थळी बोलावुन सदर इसमास उपचार कामी ससुन हॉस्पीटल येथे नेवुन अँडमीट केले. तसेच सदर इसमाकडे पत्ता व नावाचा काही एक पुरावा नसल्याने घटनास्थळी पडलेल्या त्यांचे गाडीचे क्र. वरुन त्याचा पत्ता ट्रेस करून त्याचे नातेवाईकांना हॉस्पीटला बोलावुन घेतले.त्यांचे नाव कुमार सिंग वय ३५ वर्षे रा धानोरी पुणे. सदर इसम हा सायंकाळी १६.०० शुध्दीवर आला असुन त्यांची तब्येत ठिक आहे.

पोलीसांनी सदर इसमास तात्काळ अँडमीट करून त्याचा जीव वाचविण्याबद्दल त्यांच्या नातेवाईकांनी पोलीसाचे आभार मानले आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोफौ शिवशंकर कांबळे,पो.हवा दिनकर लोखंडे,पो.ना संतोष केगंले, पो.शि लिनेश घोळवे ,व म.पो.शि अश्वीनी खरबस विश्रांतवाडी पोलीस स्टेशन यांनी केली आहे.